8:54 47%



# सायबर सुरक्षिततेबाबत विद्यार्थ्यांना दिले धडे



शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे.

**प्रतिनिधी** | जळगाव

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढलेल्या वापरामुळे सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता केल्यास गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी विद्यापीठात 'सायबर सुरक्षितता आणि जागरूकता'वर ही कार्यशाळा झाली. यावेळी सायबर सेलचे पोलिस उपनिरीक्षक दिगंबर थोरात, क्विक हिल फाउंडेशनचे महेश भरडी, महाराष्ट्र पोलिसाचे सचिन सोनवणे व दिलीप चिंचोले यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते. विद्यापीठाने फाउंडेशनसोबत करार केल्यापासून या उपक्रमातून समाजातील एक लाखापेक्षा अधिक लोकांमध्ये सायबर जागरूकतेचे कार्य करण्यात आले आहे.